NP

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.

दिनांक:- 24 MAY 2000

कार्यालयीन आदेश क्रमांक ६४ दिनांक :-

---

विषय:- नगरपालिका लेखा परीक्षण अहवालाचे अंतिमीकरणाबाबत.

संदर्भ :- त्रि विभागीय बैठक [डॉ. पंजाबराव देशमुख, कृषि विद्यापिठ ] अकोला येथील दि. १७ मार्च २००० चा कार्यवृत्तांत क्र. स्था. १८/ब/सभा/अएसअे/५५७ दिनांक १० एप्रिल २०००.

उपरोक्त विषयावर राहूरी येथील बैठकीत सविस्तर चर्चा होऊन जिल्हातील विविध विभागाचे/संस्थाचे लेखा परीक्षण सुरळीतपणे पार पाडण्यासाठी व लेखा परीक्षणात अधिक सुसंगती कार्यक्षमता वाढविणेचे दृष्टीने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१] या कार्यालयाने यापुर्वी निर्गमित केलेले कार्यालयीन आदेश क्रमांक ५ दिनांक २० जानेवारी २००० आणि कार्यालयीन आदेश क्र. ३ दिनांक १४ जानेवारी २००० रद्द करण्यात येत आहेत.

२] जिल्ह्यांतील "ब" व "क" वर्गाच्या नगरपालिकांच्या लेखा परीक्षण अहवालाचे अंतिमीकरण करण्याचे अधिकार जिल्हा उपमुख्य लेखा परीक्षक यांच्याकडे राहतील आणि असे अहवाल त्यांच्या स्वाक्षरीने निर्गमित होतील. मात्र "अ" वर्ग नगरपालिकांच्या लेखा परीक्षण अहवालाच्या अंतिमीकरणाचे अधिकार विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक/मुख्य लेखा परीक्षक, [उपलब्धतेनुसार ] यांना असतील आणि असे लेखा परीक्षण अहवाल उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ] यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यांत येतील.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.

माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

---

१] उपमुख्य लेखा परीक्षक [वरीष्ठ], स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.
२] उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, [सर्व]
३] उपमुख्य लेखा परीक्षक [अहवाल] स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४] सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी [अहवाल]
५] अभिलेखापाल.
६] संबंधित लिपिक.